॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

EXAMINATION DEPARTMENT

Phone: (02462) 215294
Fax : (02462) 215520
Website: www.srtmun.ac.in
E-mail: directorboee@srtmun.ac.in

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२६–२७/९९२१ **दिनांक** : २६/११/२०२६

हिवाळी–२०२६च्या BSc-NEP अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबत
महत्त्वाचे परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित पदवी विज्ञान महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : हिवाळी–२०२६च्या BSc-NEP अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी–२०२६च्या BSc-NEP अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाच्या लेखी परीक्षा दिनांक २६/११/२०२६ रोजी, द्वितीय वर्षाच्या लेखी परीक्षा दिनांक ०१/१२/२०२६ रोजी आणि प्रथम वर्षाच्या लेखी परीक्षा दिनांक ०५/१२/२०२६ रोजी संपत आहेत.

दुष्काळी परिस्थिती पाहता व विद्यापीठाने निर्गमित केलेल्या द्वितीय सत्राच्या सुधारित शैक्षणिक दिनदर्शिकेनुसार शिकवणी वर्गांची सुरुवात दिनांक ०७/१२/२०२६ पासून होत असल्यामुळे उपरोक्त वर्गाच्या प्रात्यक्षिक परीक्षा बहि:स्थ परीक्षकांच्या उपलब्धतेनुसार महाविद्यालय स्तरावर वेळापत्रक तयार करून प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रात्यक्षिक परीक्षेचे नियोजन दिनांक २७/११/२०२६ ते १०/१२/२०२६ या दरम्यान खालीप्रमाणे करावे.

तसेच या दरम्यान प्रात्यक्षिक परीक्षेत काम करणाऱ्या प्राध्यापकांनी दिनांक ०७/१२/२०२६ नंतरच्या तासिकांचे नियोजन करावे, जेणेकरून शैक्षणिक कार्य व्यवस्थितरित्या पूर्ण होईल.

सदर कालावधीत महाविद्यालय स्तरावर वेळापत्रक व विद्यापीठ मान्यताप्राप्त अंतर्गत परीक्षकांची नेमणूक आणि बहि:स्थ परीक्षकांशी चर्चा करून परीक्षेच्या तारखा निश्चित करून त्यांची नेमणूक करावी.

प्रात्यक्षिक परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेऊन ऑनलाईन लिंकवर प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण भरावेत व ऑनलाईन गुणदान केलेल्या यादीची सत्यप्रत, बहि:स्थ परीक्षकांच्या स्वाक्षरीसह उपस्थिती अहवाल व उत्तरपुस्तिका, अंतर्गत व बहि:स्थ परीक्षकांचे नेमणूक पत्र इत्यादी प्रात्यक्षिक परीक्षा संपल्यानंतर लगेचच विद्यापीठात सादर करावेत.

सबब, उपरोक्तप्रमाणे हिवाळी–२०२६च्या BSc-NEP अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक परीक्षेसंबंधीची कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल परीक्षा विभागास सादर करावा, ही विनंती.

प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :
१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ. २. मा. प्र–कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ. ४. मा. अध्यक्ष, सर्व अभ्यासमंडळे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
५. सीनिअर प्रोग्रामर, संगणक कक्ष, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.